# परवरदिगार प्रार्थना

## (मेहेरबाबांनी दिलेली)

हे परवरदिगार !

सर्वांचे पालन करणारा व रक्षण करणारा,
तू अनादि व अनंत आहेस,
तू अद्वैत व तुलनातीत आहेस;
तुझा थांग कोणालाही लागू शकत नाही.
तुझ्या ठायी रंग नाही, अभिव्यक्ती नाही, रूप नाही,
तसेच गुणही पण नाहीत.
तू अमर्याद आणि अगाध आहेस,
तर्क व कल्पना यांपलीकडे आहेस,
तू सनातन व अविनाशी आहेस.
तू अविभाज्य आहेस,
दिव्य दृष्टीशिवाय तुला कोणीही पाहू शकणार नाही.
तू सतत होतास, तू सतत आहेस व सतत राहशीलही.
तू सर्व ठिकाणी आहेस,
सर्वांत आहेस आणि सर्व ठिकाणांच्या तसेच सर्वांच्या
पलीकडेही आहेस.
तू आकाशमंडळात आहेस व पाताळांत आहेस.
तू व्यक्त आणि अव्यक्तही आहेस;
आणि सर्व भूमिकांवर तसेच,
सर्व भूमिकांच्या पलीकडेही आहेस.
तू तीनही भुवनांत आहेस व त्रिभुवनापलीकडेही आहेस.
तू अगोचर असून स्वतंत्र आहेस.
तू विश्वकर्ता व देवदेवेश्वर आहेस.
तू सर्व मनांचा व हृदयांचा ज्ञाता आहेस.

तू सर्वशक्तिमान व सर्वव्यापी आहेस.
तू अनंत ज्ञान, अपरिमित शक्ती व असीम आनंद आहेस.
तू ज्ञानसिंधू आहेस; सर्वज्ञ व अनंत-ज्ञानी आहेस;
भूत, वर्तमान व भविष्य यांचा तू ज्ञाता असून,
स्वयमेव ज्ञानच आहेस.
तू दयेचा सागर असून सदैव कल्याणकारी आहेस.
अनंत गुणांनी नटलेला तू आत्म्यांचा आत्मा आहेस.
सत्य, ज्ञान व आनंद यांची त्रयी तू आहेस.
तू सत्याचा उगम असून प्रेमाचा सागर आहेस.
तू आदिपुरूष असून श्रेष्ठांहून श्रेष्ठ आहेस.
तू प्रभू व परमेश्वर आहेस.
तू परमदेव असून, परात्पर परमात्मा आहेस.
तू परब्रह्म आहेस;
तू अल्लाह, इलाही, यझ्दान,
आहूरमझ्द व प्रियतम परमेश्वर आहेस.
तुझे नाव एजद् अर्थात एकमेव पूजनीय आहे.

## पश्चात्ताप प्रार्थना

### (मेहेरबाबांनी दिलेली)

हे दयासागर प्रभूराज!

आमच्या हातून घडलेल्या सर्व पापांबद्दल
आम्हाला पश्चात्ताप होत आहे.
असत्य, अन्याय्य आणि अमंगल अशा प्रत्येक विचाराबद्दल, बोलू नये अशा बोलल्या गेलेल्या प्रत्येक शब्दाबद्दल व करू नये अशा केलेल्या प्रत्येक कृतीबद्दल

आम्हाला पश्चात्ताप होत आहे.
स्वार्थाने प्रेरित अशा प्रत्येक कृत्याबद्दल, शब्दाबद्दल व विचाराबद्दल, तसेच द्वेषमूलक असे प्रत्येक कृत्य, शब्द व विचार यांच्याहीबद्दल आम्हाला पश्चात्ताप होत आहे.
विशेषत:, प्रत्येक कामुक विचाराबद्दल व कामुक कृत्याबद्दल आम्हाला पश्चात्ताप होत आहे. तसेच, खोटेपणाबद्दल, सर्व प्रकारच्या ढोंगांबद्दल आणि देऊनही पूर्ण न करू शकलेल्या प्रत्येक वचनाबद्दल, लोकांच्या अनुपस्थितीत त्यांची निंदा करण्याबद्दल व त्यांचे दोष दाखविण्याबद्दल, आम्हाला पश्चात्ताप होत आहे.
आणि विशेषकरून दुसऱ्यांची हानी करणाऱ्या प्रत्येक कृत्याबद्दल, दुसऱ्यांना दु:ख देणाऱ्या प्रत्येक शब्दाबद्दल आणि कृतीबद्दल आणि दुसऱ्यांना दु:ख व्हावे अशा प्रत्येक इच्छेबद्दल,
आम्हाला पश्चात्ताप होत आहे.
हे प्रभुराज ! आमच्यावर अपार दया करून, आम्ही केलेल्या पापांबद्दल आम्हांला क्षमा कर, तसेच तुझ्या इच्छेप्रमाणे विचार करण्याच्या, बोलण्याच्या व वागण्याच्या बाबतीत आमच्या हातून सतत ज्या चुका झाल्या, त्यांच्याबद्दलही आम्हाला क्षमा कर.

## मेहेरबाबांचे मंडळीजन आणि प्रेमीजनांकरिता मेहेरबाबांनी दिलेली प्रार्थना

प्रियतम परमेश्वरा, तुझ्यावर अधिकाधिक प्रेम करण्याकरिता आम्हा सर्वांना तू सहाय्य कर. अधिक, आणखी अधिक आणि त्याहूनही अधिक प्रेम, तुझ्याशी एकरूप होण्यास पात्र होईतो आम्ही करीत रहावे यासाठीही आम्हास तू मदत कर आणि प्रियतम बाबांचा दामन अगदी अखेरच्या क्षणापर्यंत हाती घट्ट रहावा यासाठी देखिल आम्हा सर्वांना तू सहाय्य कर.